ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

GENIUS

Single Blind Review / Double Blind Review

Volume - XV | Issue - I | August - January 2026-27

ENGLISH / MARATHI / HINDI PART - I

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

Impact Factor / Indexing
2026 -8.077
www.sjifactor.com

EDITOR

Dr. Vinay Shankarrao Hatole
Assistant Professor, International Center of Excellence in Engineering
& Management (ICEEM) College, Waluj, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

PUBLISHED BY

AJANTA PRAKASHAN
Jaisingpura, Chhatrapati Sambhajinagar. (MS)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"GENIUS"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad), also Published the same at Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad)

Printed by

Ajanta Computer,
Near University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad),
Maharashtra, India

Published by

Ajanta Prakashan,
Near University Gate, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad),
Maharashtra, India
Cell No. : 9579260877, 9822620877
E-mail : ajanta2023@gmail.com, www.ajantaprakashan.in

GENIUS - ISSN 2279 - 0489 - Impact Factor - 8.077 **(www.sjifactor.com)**

EDITORIAL BOARD

Dr. S. Umesha
Dept. Of Studies in Biotechnology, University of Mysore, Manasagangotri, Mysore, India.

Dr. Tharanikkarasu K.
Dept. Of Chemistry, Pondicherry University (Central University), Kalapet, Puducherry, India.

Professor Kaiser Haq
Dept. of English, University of Dhaka, Dhaka 1000, Bangladesh.

Dr. Altaf Husain Pandit
Dept. of Chemistry University of Kashmir, Kashmir, India.

Dr. Deepak Sinkar
Assistant Professor, Department of Visual Art, PLC- State University of Performing and Visual Arts, Rohtak Haryana.

Prof. P. N. Gajjar
Head, Dept. Of Physics, University School of Sciences, Gujarat University, Ahmedabad, India.

Dr. Uday P. Dongare
Head, Dept. Of Physical Education, Shivaji Art's, Commerce & Science College, Kannad, Aurangabad, India.

Roderick McCulloch
University of the Sunshine Coast, Locked Bag 4, Maroochydore DC, Queensland, 4558 Australia.

Dr. Mita Howladar
Assistant Professor, Calcutta Girls B. T. College Kolkata, West Bengal, India.

Brian Schiff
Brussels, Copenhagen, Madrid, Paris.

Dr. Prashant M. Dolia
Dept. Of Computer Science & Applications, Bhavnagar University, India.

Dr. Nicholas Ioannides
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor, Faculty of Computing, North Campus, London Metropolitan University, 166-220 Holloway Road, London, N7 8DB, UK.

Dr. Ritu Sehgal
Assistant Professor, DAV Institute of Engineering and Technology, Jalandhar, Punjab.

Dr. K. B. Laghane
Dean. Faculty of Management Science.
Dean. Faculty of Commerce (Dr. B.A.M.U.)
Head Commerce Dept., Vivekanad College, Samarth Nager, Aurangabad, India.

Prof. Avinashi Kapoor
Head, Dept. Of Electronic Science, Dean, Faculty of Interdisciplinary Sciences, Chairman, Board of Research Studies, South Campus, University of Delhi, New Delhi, India.

Dr. Farhath Ali
Department of Education, Moulana Azad National Urdu University Hyderabad, T.S.

EDITORIAL BOARD

Dr. Hanumanthappa J.
Dept. Of Studies In Computer Science,
University of Mysore, Manasagangotri,
Mysore-570 006, Karnataka, India.

Dr. Asharf Fetoh Eata
College of Arts or Science Salmau Bin
Adbul Aziz University, KAS.

Dr. Kailas Thombre
Research Guide, Dept .of Economics
Deogiri College, Aurangabad, India.

Dr. Isita Lahiri
Dept. of Business Administration,
University of Kalyani, Kalyani West Bengal.

Dr. Nirmala S. Padmavat
Assit. Prof. English Dept. Nutan Mahavidyalaya,
Selu, Dist: Parbhani

Dr. Lalit Gopal
Assistant Professor, Department of Design,
BBK DAV College for Women, Amritsar. (Punjab)

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

CONTENTS OF ENGLISH PART - I

S. No.	Title & Author	Page No.
1	Growth, Issues and Challenges in Service Sector in India **Dr. Pradeep Singh Tomar**	1-9
2	A Study of Selected Psychological Differences between Elite Level Football and Hockey Players **Dr. Bhupendra Singh Arjun Singh**	10-13
3	Immigration, Cultural Displacement and Identity Crisis in Manju Kapur's The Immigrant **Ms. Anita D. Patil**	14-19
4	The Role of Artificial Intelligence in Plea Bargaining: A Critical Analysis of Efficiency, Fairness, and Legal Implications **Suryakant Ramchandra Deshmukh** **Dr. Yogesh Ashok Mahajan**	20-24
5	Taxonomy and Diversity of Amauroderma from Kinwat (Nanded) Districts, Marathawada, Maraharashtra **Dr. Uddhav Kishan Raibhole**	25-30
6	Artificial Intelligence in Financial Services: Opportunities and Risks **Dr. Archana Keshavrao Deshmukh**	31-39
7	The Uncodified Arena:Media Trial and Its Evidentiary Fallout in Indian Law **Dr. Pavitra S. Bankar**	40-45

CONTENTS OF MARATHI PART - I

अनु.क्र.	लेख आणि लेखकचे नाव	पृष्ठ क्र.
१	आर्थिक साक्षरता - काळाची गरज **कु. किरण झाडे** **डॉ. ललिता जोशी**	१-३
२	भारत व अफगाणिस्तान यांच्यातील परकीय व्यापाराचा एक अभ्यास **राहुल प्रकाश उदासी** **डॉ. योगेश ए. पाटील**	४-८
३	भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील प्रमुख समस्या **प्रा. पूजा गोकुळ देवरे**	९-१५
४	सर बदरुद्दीन तैयबजी : न्यायव्यवस्था, शिक्षण आणि सामाजिक सुधारणांचा चिकित्सक अभ्यास **शेख इरफान शेख अय्युब**	१६-२२
५	पिंपरी –चिंचवड महानगरपालिका महिला सफाई कामगारांच्या आर्थिक समस्यांचा एक अभ्यास **डॉ. जयश्री अभिमन्यू डंके**	२३-२८
६	इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना भूमितीय रचना करताना येणाऱ्या समस्या / अडचणी व त्यावरील उपाययोजना **श्री. सुहास मिश्रीकोटकर**	२९-३९
७	ग्रंथालय हेच शिक्षण आणि ज्ञानाचे दालन **डॉ. प्रतिभा लक्ष्मण वराडे**	४०-४२
८	दुग्ध व्यवसाय-एक शेतीवर आधारित उद्योग **डॉ. बिराजदार श्रीमंत महादेव**	४३-४८
९	तुकडोजी महाराजांचे धर्मविषयक चिंतन **डॉ. वेदप्रकाश डोणगावकर**	४९-५३
१०	अनुलोम विलोम शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी वरदान **डॉ. वसुधा नंदनवार**	५४-६०
११	माध्यमिक शिक्षणातील बहुभाषिकता : एक विहंगावलोकन **पांचाळ विश्वनाथ मारोती** **प्रा. डॉ. सुनिता यादवराव पाटील**	६१-६६

CONTENTS OF HINDI PART - I

अनु. क्र.	लेख और लेखक के नाम	पृष्ठ क्र.
१	भारत के डिजिटल युग में बौद्धिक दिव्यांग बच्चों की शिक्षा के अवसर और चुनौतियाँ : वर्तमान एवं भविष्य की संभावनाएँ **अन्नपूर्णा चतुर्वेदी** **डॉ. मनोज कुमार झारिया**	१-९
२	सामाजिक रूढीग्रस्त मानिसिकता का शिकार देवदास **डॉ. प्रणिता लक्ष्मणराव पाटील**	१०-१४

VOLUME - XV, ISSUE - I - AUGUST - JANUARY - 2026-27
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 8.077 (www.sjifactor.com)

९. तुकडोजी महाराजांचे धर्मविषयक चिंतन

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
सहयोगी प्राध्यापक आणि तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम.

सारांश

धर्म ही एक सामाजिक संस्था आहे. मात्र तात्विक दृष्टिकोनातून विचार केला असता धर्म ही जीवन जगण्याची एक पद्धती सुद्धा आहे. अर्थात धर्माला अनुसरून मानवी जीवनाचे नियमन आणि व्यवहार होणे हे तत्त्वज्ञानामध्ये अपेक्षित आहे. याच अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी देखील धर्मविषयक आपले चिंतन मांडलेले आहे. सर्वसाधारणपणे ईश्वराने किंवा ईश्वराच्या अवताराने जे सांगितले आहे त्यानुसार वागण्याला धर्म समजले जाते. काही अंशी ते मान्य ही करता येईल. परंतु धर्माचा खरा उद्देश काय ? याविषयी तुकडोजी महाराजांच्या दृष्टिकोनातून चिंतन केले असता असे लक्षात येते की, मानवी समाजाला सुव्यवस्थित ठेवण्याकरिता जी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे तोच धर्म होय. याच अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी धर्मविषयक जे विवेचन आपल्या ग्रामगीता या ग्रंथात केले आहे, ते महत्त्वाचे आहे.

सूचक शब्द : धर्म, लौकिक पारमार्थिक, धर्मनिती, धार्मिक, धर्मवान, मानव समाज, समान समाधान, कर्तव्य, धर्माची लक्षणे, धर्मनीति, धार्मिक वृत्ती, धर्मवान

उद्दिष्ट्य

वास्तविक पाहता धर्म ही एक सामाजिक संस्था आहे. धर्म हा व्यक्ती आणि समाजाच्या हिताकरिता असतो. मात्र असे असताना आज धर्माला एक संकुचित अर्थ प्राप्त झालेला दिसून येतो. अर्थात धर्म ही सर्व समावेशक अशी संस्था आहे हे पटवून सांगण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या धर्मविषयक विचारांचा परामर्श घेणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोध निबंध लिहीत असताना प्रामुख्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लिहिलेल्या ग्रामगीता या ग्रंथातील ओव्यांचे "विश्लेषण" करण्याची पद्धती उपयोगात आणली जाणार आहे.

प्रस्तावना

"ज्याला आपण धारण करतो तो धर्म." प्राचीन काळापासून धर्माची ही अशाप्रकारे व्याख्या केली जाते. परंतु आपण नेमके काय धारण करावे किंवा काय धारण करू नये ? हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न असतो. वास्तविक पाहता देश काळ परिस्थितीनुसार काय धारण करावे आणि काय धारण करू नये याचे काही निकष प्रत्येक काळात होऊन गेलेल्या प्रत्येक संत महात्म्यांनी आपापल्या

परीने सांगितलेले आहेत. भारताच्या भूमीवर आधुनिक काळामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी देखील धर्माचा अर्थ स्पष्ट करीत त्या धर्माची लक्षणे काय आहेत याकडे आपले लक्ष वेधलेले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे खरे नाव माणिक इंगळे असे असून त्यांचा जन्म 1909 अमरावती जिल्ह्यातील यावली या गावी झाला. त्यांनी ग्रामगीता या ग्रंथाची रचना केली. एका अर्थाने ग्रामीण भागातील लोकांसाठी या ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी एक आचारसंहिता सुचविली आहे. तुकडोजी महाराजांनी राष्ट्रसेवा या विषयाला आपल्या साहित्यातून अधिक महत्त्व दिले. त्यांच्या दृष्टिकोनातून मनुष्याने भौतिक आणि अध्यात्मिक अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये स्वतःला परिपूर्ण केले पाहिजे. एका व्यक्तीचा विकास म्हणजे त्याच्या कुटुंबाचा विकास, त्याच्या कुटुंबाचा विकास म्हणजे त्याच्या गावाचा विकास आणि त्याच्या गावाचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास अशी त्यांची धारणा होती. आणि याच भावनेतून त्यांनी धर्मविषयक आपले चिंतन मांडलेले आहे.

धर्म विषयक चिंतन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेच्या दुसऱ्या अध्यायामध्ये धर्मविषयक चिंतन मांडलेले आहे. त्यांच्या मतानुसार, या भूतलावर मानवी समाजाला चांगल्या प्रकारे राहण्याच्या उद्देशाने देवांनीच धर्म निवेदिला आहे. ज्याप्रमाणे प्राचीन काळात वैशेषिक दर्शनाचे प्रवर्तक महर्षी कणाद यांनी, "ज्याने अभ्युदय आणि नि:श्रेयस प्राप्त होतो त्याला धर्म म्हटले आहे." (वैशेषिक सूत्र, प्रथम अध्याय) त्याप्रमाणे तुकडोजी महाराजांनी देखील, ज्याचा लौकिक आणि पारमार्थिक स्वरूपाने विस्तार झाला आहे त्याला धर्म मानले आहे. (ग्रा. २/२) म्हणजेच धर्म हा विषय केवळ ईश्वर आणि ईश्वराची भक्ती किंवा तत्सम कर्म करण्यापुरता मर्यादित नाही. तर आपल्या व्यवहारिक जीवनामध्ये ज्या ज्या गोष्टी घडतात त्या सर्वांशी धर्म हा विषय संबंधित आहे. धर्माचा अर्थ अधिक स्पष्ट करण्याच्या संबंधाने तुकडोजी महाराजांनी धर्माच्या काही लक्षणांचा उल्लेख आवर्जून केलेला आहे. त्यातूनच धर्माचा परमार्थिक अर्थ आणि व्यावहारिक अर्थ आपल्याला लक्षात येतो.

धर्माचा पारमार्थिक अर्थ

धर्माचा पारमार्थिक अर्थ स्पष्ट करताना तुकडोजी महाराज म्हणतात,

अनेक प्राणी जेथे राहती । त्या सर्वांची राहावी सुस्थिती ।

समान समाधानाची गति । त्यास धर्म म्हणावे ॥ (ग्रा. २/३)

म्हणजेच ज्याठिकाणी अनेक प्राणी सुस्थितीमध्ये राहतात अशा सर्व प्राण्यांच्या ठिकाणी "समान समाधानाची" जी "गति" असते, त्यास तुकडोजी महाराजांनी धर्म म्हटले आहे. परंतु ही समान समाधानाची गती कधी वाढेल किंवा कशाने वाढेल ? हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. आणि त्याच्या उत्तरात तुकडोजी महाराज म्हणतात की, "की प्रत्येकाने आपल्या स्वतःला पहिल्यांदा आत्मरूप मानले पाहिजे. आणि ज्याप्रमाणे मी आत्मरूप आहे त्याप्रमाणे इतरही लोक आत्मरूप आहेत असे मानून सर्वांच्या ठिकाणी समान भावना बाळगली पाहिजे. एका अर्थाने हे संपूर्ण विश्व माझे कुटुंब आहे असे मानून त्यानुसार आचार आणि विचार ठेवला पाहिजे." (ग्रा. २/४) एकंदर पारमार्थिक दृष्टिकोनातून जेव्हा आपण धर्म या संकल्पनेकडे पाहतो तेव्हा त्याच्यामध्ये सर्व जीवमात्रांच्या

बद्दल एक समत्व भाव ठेवणे गरजेचे असते. किंबहुना माझ्या, तुझ्या आणि सर्वांच्याच कल्याणाचा विचार करणे हे धर्म संकल्पने अंतर्गत गरजेचे असते आणि तोच खऱ्या अर्थाने धर्माचा आशय असतो.

मात्र अलीकडे आपण पाहतो की, काही धर्म किंवा धर्माच्या नावाने वागणारे काही लोक केवळ आपले आणि आपल्या समूहाचे हित कसे जोपासता येईल याचा प्रयत्न करीत असतात. त्यांच्या करिता इतरांचे सौख्य फार काही महत्त्वाचे नसते. अशा प्रकारच्या या लोकांना उद्देशून तुकडोजी महाराज म्हणतात

आपुली साधावी उन्नती । सौख्य द्यावे इतरांप्रती ।

या उद्देशे जी जी संस्कृती । धर्म म्हणावे तिजलागी ॥ (ग्रा. २/५)

म्हणजे धर्म ही एक अशा प्रकारची संस्कृती आहे की तिथे केवळ आणि केवळ आपल्या वैयक्तिक उन्नतीला महत्व नसते. तर आपल्या उन्नती बरोबरच इतरांच्या ही सौख्याचा विचार होणे फार गरजेचे असते. अर्थात केवळ स्वार्थ नाही तर परमार्थ जोपासणे ही ज्या ज्या मानवी समूहाची संस्कृती असते त्या संस्कृतीला तुकडोजी महाराज 'धर्म' संबोधतात. एका अर्थाने इतरांप्रती आपले काहीतरी कर्तव्य असतात हे देखील तुकडोजी महाराज या निमित्ताने सुचविताना दिसतात. यातूनच धर्म हा केवळ परमार्थिक विषयी नाही तर तो व्यवहारिक विषय देखील आहे हेच यातून अधोरेखित होते.

धर्माचा व्यवहारिक अर्थ

धर्म ही केवळ वैयक्तिक बाब नाही तर एक सामाजिक जाणीव सुद्धा आहे. सामाजिक जाणीव म्हटलं की त्यात एकमेकांप्रति होणारा व्यवहार अंतर्भूत असतो आणि त्यामुळे धर्माला व्यवहारिक अर्थ सुद्धा प्राप्त होतो. तुकडोजी महाराज म्हणतात त्याप्रमाणे,

परस्परांशी वागणूक । ज्यात न्याय नीति सम्यक ।

प्रत्येकाचे कर्तव्य चोख । धर्म ऐसे त्या नाव ॥ (ग्रा. २/६)

म्हणजेच सामाजिक जीवन जगत असताना आपली परस्परांशी वागणूक हे न्याय आणि नीती वर आधारित असली पाहिजे. आणि हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा प्रत्येक व्यक्ती आपले कर्तव्य नीट समजून त्या कर्तव्याला चोखपणे पूर्णत्वास नेते. अर्थात जर आपण आपली कर्तव्य नीट पार पाडली नाही तर ते न्याय संगत किंवा नीती सम्यक ठरणार नाही. परिणामी सामाजिक जीवन जगत असताना किंवा परस्परांशी व्यवहार करीत असताना कुठल्याही प्रकारची स्थिरता आपल्याला दिसून येणार नाही. म्हणून व्यवहारिक जीवनामध्ये प्रत्येक व्यक्तीने वैयक्तिक पातळीवर कर्तव्यनिष्ठा आणि परस्पर संबंधांमध्ये न्याय व नीतीला योग्य रीतीने महत्व दिले पाहिजे. तुकडोजी महाराजांच्या दृष्टिकोनातून धर्माची एक नीति असते. अर्थात धर्माअंतर्गत, "कोणीही कोणाचा द्रोह करू नये, आपण आपला उत्कर्ष साधावा आणि जे काही साध्य केले आहे त्यात समाधान मानावे, कोणत्याही गोष्टीचे दुःख मानू नये." हीच धर्मानीति होय. अशा या धर्मनितीला प्रत्येक साधकाने अभ्यास स्वरूपात सदैव स्मरणात ठेवावे असे तुकडोजी महाराज आवर्जून सांगतात. (ग्रा. २/७-८)

आज आपण पाहतो की, समाजामध्ये धर्माच्या नावाखाली नाही नाही ते प्रकार करणारे, त्या धर्माच्या आधारे सत्ता मिळविणारे, एकदा का हातात सत्ता आली की त्या सत्तेचा दुरुपयोग करणारे अनेक लोक आहेत. विशेष म्हणजे असे हे लोक स्वतःला धार्मिक समजतात. परंतु तुकडोजी महाराजांच्या दृष्टिकोनातून धार्मिक असण्याची लक्षणे काही वेगळीच आहेत. त्यांच्या मतानुसार, "या संसारामध्ये वेगवेगळ्या प्रकारची लोक असतात. प्रत्येक व्यक्तीचे कामे सुद्धा वेगळी आहेत. प्रत्येकाचे गुण आणि नाम सुद्धा वेगवेगळे आहेत. परंतु प्रत्येक व्यक्ती सुखालाच आपले सहकारी मानते. मात्र असे असले तरी कोणीही त्या सुखाच्या आकांक्षेने आसक्त होऊ नये, सदैव आपल्या स्वतःच्या कामात रहावे, विशेष म्हणजे आपण जे काही कर्म करत आहोत ते सत्कर्म ठरावीत, महत्वाचे म्हणजे केलेल्या कर्माविषयी दंड मिळेल याची कधीही भीती बाळगू नये." जी व्यक्ती अशा प्रकारचे आचार आणि विचार ठेवते त्याच व्यक्तीला धार्मिक वृत्तीची व्यक्ती समजावे, असे तुकडोजी महाराज म्हणतात. (ग्रा. २/९-१०)

तुकडोजी महाराजांनी 'धर्मवान' कोणाला म्हणावे ? यासंदर्भातही आपले चिंतन मांडले आहे. त्यांच्या मतानुसार, "जी व्यक्ती आरोग्य तत्पर असते त्या व्यक्तीला वैद्य किंवा डॉक्टर लागत नाही, जी व्यक्ती न्यायनिष्ठा ठेवणारी असते आणि त्यानुसार व्यवहार करणारी असते त्याला वकील किंवा न्यायाधीश लागत नाही, जो कोणालाही चाकू किंवा तलवारीचा धाक दाखवत नाही, एखादी चुकीची गोष्ट घडली तर ज्याचा आत्मा तळमळतो, जो देवालाच सर्व साक्षी मानतो. अशी ही व्यक्ती 'धर्मवान' असते." अशा या धर्मवान व्यक्तीसाठी बाह्य औडंबर, बाह्य चिन्ह गौण असतात किंबहुना जे लोक बाह्य औडंबर आणि बाह्य चिन्हांना महत्त्व देतात तो धर्म नसतो असेही तुकडोजी महाराज सांगतात. (ग्रा. २/११-१४)

तुकडोजी महाराजांनी धर्म ही संकल्पना कशा प्रकारे सामाजिक संकल्पना आहे हे अत्यंत मार्मिकपणे स्पष्ट करून दाखविले आहे. त्यांच्या मतानुसार, व्यक्तीधर्म, कुटुंबधर्म, समाजधर्म, गावधर्म आणि राष्ट्रधर्म असे हे धर्माचे प्रकार आहेत. अनुक्रमे प्रत्येक धर्म एकमेकास पूरक ठरतो आणि त्यातूनच राष्ट्रधर्म हा बळकट होत जातो. असा हा राष्ट्रधर्मच विश्वाला शांती देण्यास उपयुक्त ठरतो. मात्र हा राष्ट्रधर्म विश्वशांतीसाठी कारक ठरण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपापल्या लौकिक व्यवहारामध्ये 'शुद्ध सात्विकता' प्रकट केली पाहिजे. आपल्या चारित्र्य संपन्नतेतून राष्ट्रधर्म बळकट केला पाहिजे. आणि हे करण्याकरिता जी जी काही व्यवस्था निर्माण केली जाईल त्यालाच धर्म म्हणावे. अशा ह्या धर्माची मुख्य लक्षणे "त्याग, अहिंसा, सत्य, अपरिग्रह, ब्रह्मचर्य" असल्याचे सुद्धा तुकडोजी महाराज सांगतात. अशा या धर्माच्या आधारे सबंध विश्वाला सुखी करण्याच्या अनुषंगाने तुकडोजी महाराज म्हणतात, "निर्भयता, शरीर श्रम, परस्परांशी प्रेम, विद्येचा सदुपयोग" यासारख्या गोष्टी सुद्धा प्रत्येक व्यक्तीच्या आचार आणि विचारातून व्यक्त झाल्या पाहिजे. मात्र विश्वाला सुखी करणे म्हणजे केवळ विश्वाचा औद्योगिक विकास करणे नाही तर विश्वात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा "शरीर, मन, वाणी, इंद्रिय, बुद्धी, प्राण" या सगळ्याच गोष्टींचा विकास झाला तर तोच खऱ्या अर्थाने धर्म ठरतो; असेही तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगीतेतून सांगतात. (ग्रा. २/१५-२५)

निष्कर्ष

धर्म ही एक सामाजिक संस्था आहे. समाजात वावरणाऱ्या प्रत्येक घटकाचे कल्याण साधने हे खऱ्या अर्थाने धर्माचं कार्य आहे. परंतु जेव्हा धर्माला केवळ आणि केवळ दैवी शक्तीच्या संदर्भाने पाहिले जाते तेव्हा श्रद्धा आणि कर्मकांड यासारख्या गोष्टी त्या धर्मांतर्गत येतात. परिणामी असा हा धर्म व्यक्ती किंवा समूह विशिष्ट ठरतो. किंबहुना त्याला सांप्रदायिक स्वरूप प्राप्त होते आणि तो सर्वांसाठी राहत नाही. परंतु जो धर्म व्यक्तीच्या आचार आणि विचारावर आधारित असतो, ज्यात नीति आणि नियमांना सार्वभौमत्व प्राप्त होतते तोच धर्म काळाच्या ओघात टिकून राहतो. अशा या सार्वभौमत्व प्राप्त होणाऱ्या धर्माची कल्पना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या चिंतनातून पहावयास मिळते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या धर्मविषयक चिंतनातून, "सार्वजनिक समाधान, परस्परांचे हित, कर्तव्याप्रतिनिष्ठा, सत्कर्म, निर्भयता, शरीर श्रम, परस्परांशी प्रेम, विद्येचा सदुपयोग, त्याग, अहिंसा, सत्य, अपरिग्रह, ब्रह्मचर्य, राष्ट्रनिष्ठा यासारख्या मूल्यांच्या आधारे धर्म, धर्मनीति आणि धर्मवान या सारख्या संकल्पनांना आकार देण्याच्या प्रयत्न केला आहे. त्यांचे हे धर्मविषयक चिंतन निश्चितच सबंध विश्वामध्ये राहणाऱ्या प्रत्येक जाती धर्माच्या व्यक्तीला आत्मसात करण्यासारखा आहे.

संदर्भ

१. ग्रामगीता, तुकडोजी महाराज, श्रीगुरुदेव आत्मनुसंधन, भू वैकुंठ, जि. चंद्रपुर